**MHBU140005912024**

दाखल दिनांकः ०३/०४/२०२४
नोंदणी दिनांकः ०३/०४/२०२४
निकाल दिनांकः २३/०३/२०२६
कालावधीः <u>०१</u> <u>११</u> <u>२०</u>
वर्षे महिने दिवस

**<u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मेहकर यांचे न्यायालय</u>**
**<u>(पिठासीन अधिकारी सपना एम. पाटील)</u>**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४८/२०२४</u>** **<u>नि.क्र.१८</u>**

| | | |
|---|---|---|
| **वादी** | : | **शिंदे पॉलीटेक्नीक कॉलेज, अंजनी बु.,**<br>**तर्फे – प्राचार्य अनिल शिवआप्पा कापसे,**<br>वयः अं. **३९** वर्षे, धंदा – **नोकरी**<br>रा. **शिंदे पॉलीटेक्नीक कॉलेज, अंजनी बु.**<br>ता. **मेहकर** जि. **बुलडाणा** |
| | | ...विरुध्द... |
| **प्रतिवादी** | : | **राहुल विश्वनाथ कटारे,**<br>वयः अं. **१९,** धंदाः **शिक्षण,**<br>राहणार– **सोनाटी,** ता. **मेहकर,** जि. **बुलढाणा** |

---

| | | |
|---|---|---|
| वादीचे अधिवक्ता | : | **श्री. के. एस. धोंडगे** |
| प्रतिवादीतर्फे | : | **एकतर्फा.** |

---

**<u>न्यायनिर्णय</u>**
(अधिघोषित दिनांक २३/०३/२०२६)

वादीने दावा प्रतिवादीकडुन रक्कम रु.४२,०००/–(बेचाळीस हजार रुपये) वसुल होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. थोडक्यात वादींचा दावा खालीलप्रमाणे आहे की,

वादीचे असे म्हणणे आहे की, वादी व प्रतिवादी हे वरीलप्रमाणे रहिवाशी असुन वादी शिंदे पॉलीटेक्नीक कॉलेज, अंजनी बु., ता. मेहकर जि. बुलडाणा ह्या

महाविद्यालयावर प्राचार्य म्हणुन काम पाहत आहे. तसेच प्रतिवादी हे सदर महाविद्यालया मध्ये सन २०२१–२०२२ ह्या वर्षामध्ये इलेक्ट्रीकल इंजि. डिप्लोमा प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेत होते. प्रतिवादी हे वादी महाविद्यालया मध्ये शिक्षण घेत असतांना प्रतिवादीने त्याची वार्षिक फी भरण्यासाठी एस.सी. प्रवर्गातुन स्कॉलरशीप चा फॉर्म भरला होता व त्यामुळे प्रतिवादीला वादी महाविद्यालयाने प्रतिवादीला कोणत्याही प्रकारची ट्युश्यन फी व डेव्हलपमेंट फी आकारली नाही. वास्तविक प्रतिवादी शिकत असलेल्या प्रथम वर्षाची फी ही रुपये ७०,०००/– होती व सदर फी ही शासन मान्य आहे.

**०३.** प्रतिवादी ह्यांनी सन २०२१–२०२२ मध्ये स्कॉलरशीप फॉर्म भरल्यामुळे सदर स्कॉलरशिप पोटी शासनाकडुन महाविद्यालयास प्रथम हप्त्यापोटी प्रतिवादीच्या फी मधील रक्कम रुपये २८,०००/– ही जमा झालेली आहे. तसेच प्रतिवादीस निर्वाह भत्ता म्हणुन प्रतिवादीच्या वैयक्तीक खात्यामध्ये रुपये १,०३२/– जमा झालेली होती. उपरोक्त प्रमाणे प्रतिवादी शिकत असलेल्या कोर्सची द्वीतीय हप्त्याची रक्कम प्रतिवादीकडे प्रलंबीत होती व स्कॉलरशिप मिळाल्यानंतर सदर फी भरणे प्रतिवादीवर बंधनकारक होते. शासन निर्णय दिनांक १७/०३/२०२२ नुसार स्कॉलरशिपचा द्वीतीय हप्ता प्रतिवादीच्या खात्यावर जमा होताच सात दिवसाचे आत प्रतिवादीने त्याच्याकडे बाकी असलेल्या रुपये ४२,०००/– फी वादी महाविद्यालयात जमा करणे प्रतिवादीवर कायदेशिर रित्या बंधनकारक होते.

**०४.** अशी परिस्थीती असतांना स्कॉलरशिपचा द्वीतीय हप्ता शासन निर्णयानुसार थेट प्रतिवादीच्या खात्यामध्ये जमा झालेला असुन सदर हप्त्यापोटी प्रतिवादीच्या खात्यावर रक्कम रुपये ४३,५००/– जमा झालेले आहे. सदर रक्कम जमा झाल्यानंतर प्रतिवादीने ७ दिवसाचे आत महाविद्यालयाची प्रतिवादीकडे थकीत असलेली रक्कम रुपये ४२,०००/– महाविद्यालयात

भरणा केलेली नाही. सदर बाब वादीने प्रतिवादीला लेखी तसेच मोबाईल फोन द्वारे कळवुन सुध्दा प्रतिवादीने सदर रक्कम भरलेली नाही व प्रतिवादी हे वादी महाविद्यालयाची दिशाभुल करीत आहात व प्रतिवादीने शासन निर्णयाचा भंग करुन अनादर केलेला आहे.

**०५.** वादीने दिनांक २३/०१/२०२४ रोजी वकीला मार्फत प्रतिवादीला उपरोक्त रक्कम ७ दिवसाचे आत वादीकडे जमा करावी अन्यथा कायदेशीर कार्यवाही करावी लागेल अशी मागणी करणारी रजिष्टर नोटीस पाठविली होती. सदर नोटीस प्रतिवादीला मिळुन सुध्दा सदर नोटीसला प्रतिवादीने कोणताही प्रतिसाद दिला नाही व रक्कम देखील वादीला दिली नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल केला आहे.

**०६.** प्रतिवादी यांना समन्स तामील करण्यात आले. परंतु प्रतिवादी न्यायालयात हजर न झाल्यामुळे नि.क्र. ०१ वरील आदेशान्वये दावा त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्यात आलेला आहे.

**०७.** त्यामुळे वादीने दाखल केलेल्या वादपत्रावरून व कागदपत्राच्या आधारे मी निर्णित करावयाचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी सिध्द करतात काय की, प्रतिवादी यांच्या महाविद्यालयामध्ये सन २०२१-२०२२ मध्ये शिक्षण घेत होते ? | **होकारार्थी.** |
| २ | वादी सिध्द करतात काय की, प्रतिवादीवर महाविद्यालयाची प्रथम वर्षाची फी इ. रुपये ४२,०००/- ( बेचाळीस हजार रुपये ) थकबाकी होते ? | **होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | वादी सिध्द करतात काय की, प्रतिवादीच्या खात्यामध्ये शासन निर्णयानुसार ४३,५००/- ( त्रेचाळीस हजार पाचशे रुपये ) शिष्यवृत्ती जमा झाली होती ? | **होकारार्थी.** |
| ४ | वादी सिध्द करतात काय की, शिष्यवृत्ती ४२,०००/- ( बेचाळीस हजार रुपये ) फी म्हणुन जमा करणे प्रतिवादीवर बंधनकारक असतांना सुध्दा वादीने रक्कम जमा केली नाही ? | **होकारार्थी.** |
| ५ | वादी सिध्द करतात काय की, प्रतिवादी हे वादीचे थकीत रक्कम ४२,०००/– ( बेचाळीस हजार रुपये ) देणे लागतात ? | **होकारार्थी.** |
| ६ | आदेश व हुकूमनामा ? | **दावा मंजूर करण्यात येतो...** |

## <u>कारणमिमांसा</u>

## <u>मुद्दा क्र. १ ते ५ बाबतः</u>

**०८.** सदर तिन्ही मुद्दे हे एकमेकाशी संलग्न असल्यामुळे ते एकत्रीत घेण्यात आलेले आहे. वादीतर्फे साक्षीदार क्र.१ अनिल शिवआप्पा कापसे यांचा पुरावा ***<u>निशाणी ०७</u>*** खाली नोंदविण्यात आलेला आहे. तसेच वादीने त्यांच्या कथनाच्या पृष्ठ्यर्थ खालीलप्रमाणे दस्तऐवज दाखल केलेले आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>दस्तऐवज</u> | <u>निशाणी क्रमांक</u> |
|---|---|---|
| १ | कॉलेजतर्फे नियुक्ती झाल्याबद्दल ठरावाची प्रत | ०८ |
| २ | कॉलेजमध्ये मुख्याध्यापक म्हणुन निवड केल्याबाबतचे पत्र | ०९ |
| ३ | प्रतिवादील नोटीस पाठविल्याची प्रत | १० |
| ४ | नोटीस पाठविल्याची पोष्टाची पावती | ११ |
| ५ | पोच पावती | १२ |

| | | |
|---|---|---|
| ६ | स्कॉलरशिपचा फॉर्म | १३ |
| ७ | प्रतिवादीचे बोनाफाईड सर्टिफिकेट | १४ |
| ८ | प्रतिवादीच्या खात्यात रक्कम जमा झाल्याबाबतची पावतीची प्रत | १५ |
| ९ | शासन निर्णयाच्या जी. आर. ची प्रमाणित प्रत | १६ |

**०९.** वादीने प्रतिवादी यांनी व्दीतीय वर्षाची स्कॉलरशिपची रक्कम रुपये ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये) अदा न केल्याचे सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.१ कापसे यांना शपथेवर तपासलेले आहे. साक्षीदार क्र.१ कापसे यांनी त्यांचे पुराव्यामध्ये दाव्यातील सर्व कथने शपथेवर सांगितलेले आहे. साक्षीदार क्र.१ कापसे यांनी त्यांचे पुराव्यामध्ये प्रतिवादी हे त्यांच्या महाविद्यालया मध्ये सन २०२१–२०२२ मध्ये इलेक्ट्रीकल इंजि. डिप्लोमा प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेत होते. प्रतिवादीने त्यांची वार्षिक फी भरण्यासाठी एस.सी. प्रवर्गातुन स्कॉलरशिपचा फॉर्म भरला होता त्यामुळे महाविद्यालयाने प्रतिवादीला कोणत्याही प्रकारची ट्युशन फी व डेव्हलपमेंट फी आकारली नाही. प्रतिवादी शिकत असलेल्या प्रथम वर्षाची फी रुपये ७०,०००/– होती व सदर फी ही शासन मान्य आहे. प्रतिवादी यांनी सन २०२१–२०२२ मध्ये स्कॉलरशिप फॉर्म भरल्यामुळे सदर स्कॉलरशिप फी मधील रक्कम रुपये २८,०००/– व निर्वाह भत्ता म्हणुन रुपये १,०३२/– ही जमा झालेली आहे. प्रतिवादी शिकत असलेल्या कोर्सची दुसरा हप्ता प्रतिवादीकडे प्रलंबित होता. प्रतिवादीला स्कॉलरशिप मिळाल्यानंतर सदर फी भरणे प्रतिवादीवर बंधनकारक होते. तसेच प्रतिवादीच्या खात्यात दिनांक १७/०३/२०२२ रोजी शासन निर्णयानुसार कॉलेजची स्कॉलरशिपचा दुसरा हप्ता ४३,५००/– (त्रेचाळीस हजार पाचशे रुपये ) प्रतिवादी त्यांच्या कॉलजचा विद्यार्थी असल्याने त्यांच्या खात्यात शासन निर्णयानुसार स्कॉलरशिप जमा झाली होती.

**१०.** त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले की, प्रतिवादी ह्यांच्याकडे स्कॉलरशिपचा दुसरा

हप्ता जमा होताच सात दिवसाच्या आत ४२,०००/– ( बेचाळीस हजार रुपये ) सदर स्कॉलरशिपची फी त्यांच्या महाविद्यालयात जमा करणे प्रतिवादीवर कायदेशीर रित्या बंधनकारक होते. प्रतिवादीच्या खात्यामध्ये रुपये ४३,५००/– जमा झाल्यानंतर सात दिवसाच्या आत त्यांनी थकीत असलेले रुपये ४२,०००/– महाविद्यालयात भरणा केलेले नाही. त्यामुळे त्यांना लेखी तसेच मोबाईल फोनद्वारे व त्यानंतर रजिष्टर नोटीस पाठऊन सुध्दा त्यांनी थकबाकी रक्कम रुपये ४२,०००/– भरले नाही.

११. प्रतिवादीविरुध्द दावा हा एकतर्फा चालविण्यात आल्यामुळे साक्षीदार क्र.१ कापसे यांचा पुरावा हा अभिलेखावर विना आव्हानात्मक राहीलेला आहे. वादीने दाखल केलेल्या दस्तऐवजाचे अवलोकन केले असता असे दिसते की, कॉलेजतर्फे नियुक्तीचे ठराव ***निशाणी क्र.०८*** मुख्याध्यापक निवड केल्याचे पत्र ***निशाणी क्र. ०९*** हे वादी महाविद्यालयाचे प्राचार्य असुन त्यांना महाविद्यालयामार्फत प्रतिवादी विरुध्द प्रकरण दाखल करण्याचे अधिकार देण्यात आले आहे. बोनाफाईड सर्टिफिकेट, ***निशाणी क्र. १४*** नुसार प्रतिवादी हे वादीच्या कॉलेजचे विद्यार्थी असुन ***निशाणी क्र. १३*** नुसार त्यांनी महाविद्यालयात स्कॉलरशिप मिळण्यासाठी फॉर्म दाखल केला होता. प्रतिवादीच्या खात्यात रक्कम जमा झाल्याबाबतची पावती ***निशाणी क्र.१५*** प्रमाणे प्रतिवादीने वादी यांच्या शिंदे पॉलिटेकनिक कॉलेजमधुन शासन निर्णयानुसार रक्कम रुपये ४३,५००/– (त्रेचाळीस हजार पाचशे रुपये ) यांच्या खात्यात जमा झाल्याचे दिसते. यावरुन, वादीचे तोंडी कथनाला पुष्टी मिळते. त्यामुळे प्रतिवादीने वादीकडे रक्कम रुपये ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) ची मागणी केली होती व त्यानुसार वादीकडे रक्कम रुपये ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) प्रतिवादीला दिले होते, ही बाब सिध्द होते.

१२. दिनांक २३/०१/२०२४ रोजी वादीच्या वकीलांनी प्रतिवादीला नोटीस

***<u>निशाणी क्र.१०</u>*** पाठवलेली आहे. त्यामध्ये नोटीस पाठवण्याच्या तारखेपर्यंत प्रतिवादीकडे स्कॉलरशिपची थकीत रक्कम रुपये ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) बाकी असल्याचे नमुद केले आहे. तसेच नोटीसचा खर्च रुपये २०००/– ची मागणी प्रतिवादीकडून केलेली आहे. अशा रितीने प्रतिवादीकडे दावा दाखल होण्याच्या तारखेला स्कॉलरशिपची थकीत रक्कम रुपये ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) येणे बाकी असल्याचे सिध्द होते. तसेच प्रतिवादीने वादीच्या लाभात सादर केलेल्या कागदपत्रांवरुन प्रतिवादी हे सदर रक्कम देणे लागतात.

**१३**. वरील सर्व बाबींचा विचार करता, मी या निष्कर्षास आली आहे की, प्रतिवादी ही वादी यांच्या महाविद्यालयात शिक्षण घेत असतांना त्यांच्या खात्यात स्कॉलरशिप रक्कम रु. ४३,५००/– (त्रेचाळीस हजार पाचशे रुपये ) जमा झाले होते. नियमानुसार ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) महाविद्यालयाची फी त्या रक्कमेतुन कपात करण्यात आवश्यक आहे. परंतु, सदर स्कॉलरशिप रक्कमेतुन प्रतिवादीने फी परत केली नाही असे वादीने सिध्द केले आहे. त्यामुळे वादी यांनी मागितलेली स्कॉलरशिप खात्यात जमा झालेले ४३,५००/– यामधुन थकीत रक्कम रु. ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) मिळण्यास पात्र आहे. **त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.**

**<u>मुद्दा क्र. ६ बाबत:</u>**

**१४**. वर नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादीला वादी यांच्या महाविद्यालयात शिक्षण घेत असतांना स्कॉलरशिप रक्कम उचल केलेली आहे व त्यांचेकडे थकीत रक्कम रु.४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) येणे बाकी आहे. त्यामुळे दावा दाखल तारखेपासून ते रकमेची वसुली होईपर्यंत, प्रतिवादी हे रुपये ४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) देणे लागतात. प्रतिवादीने स्कॉलरशिपची रक्कम थकवल्यामुळे, वादीला प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

प्रतिवादी दाव्यात हजर न झाल्यामुळे दावा एकतर्फा चालविण्यात आला त्यामुळे दाव्याचा खर्च प्रतिवादीने सोसणे न्यायोचित होईल. मुद्दा क्र.१ ते ५ चा निष्कर्ष लक्षात घेत, वादीचा दावा हा मंजूर होण्यास पात्र आहे. **त्यानुसार मुद्दा क्र. ६ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.**

## आदेश

**१.** दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी यांनी रक्कम रु.४२,०००/– (बेचाळीस हजार रुपये ) वादीस दयावे.

**३.** याप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

**४.** न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात संगणकावर टंकलिखित करण्यात आला आहे.

स्वा/–
**(सपना एम.पाटील)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
तथा न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, मेहकर

दिनांकः २३/०३/२०२६

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file Judgment/order are same word for word, as per original Judgment/order.

Name of the Stenographer : H. L. Korde
Name of the Court : Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Mehkar.
Dated : 23/03/2026
Order uploaded on : 24/03/2026